# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०४/०६/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### पोलीस स्टेशन कुही हद्दीत दारू तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

पोलीस स्टेशन कुही हद्दीतील चाफेगडी परीसरात दारूची अवैध्य वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक ०४/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.५१ वा. पोलीस स्टेशन कुही येथील अधिकारी व स्टॉफसह वरीष्ठांना माहिती देवून मा. दिपक अग्रवाल (भापोसे), पोलीस निरीक्षक कुही यांचे नेतृत्वात चाफेगडी शिवारात जावून पेट्रोलींग करीत असता इसम नामे हरीदास मोतीराम मांढरे हा आपले मोटारसायकलने येतांनी दिसला. त्याचे मोटारसायकलवर एक पिवळया रंगाची प्लॅस्टिक चुंगडी दिसली. त्याची झडती घेतली असता प्लॅस्टिक चुंगडीमध्ये भिंगरी संत्रा नं. १ ची ९० एम. एल. चे २०० निपा मिळुन आले. करीता मोटारसायकल क्र. एम.एच. ४० जे. ३७५९ किंमती ५०,०००/– रू. व २०० निपा किंमती ७,०००/– रू. असा एकुण किंमती ५७,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून पुढिल कार्यवाही करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार सा. यांचे मार्गदर्शनाखाली मा. परी. सहायक पोलीस अधिक्षक तथा प्रभारी ठाणेदार कुही श्री. दिपक अग्रवाल (भापोसे), पोउपनि. हरिहर सोनकुसरे, पो.हवा. चांगदेव कुथे, नापोशि. गोकुल सलामे, पोअं. रविन्द्र मारबदे, पोअं. पंकज सावरे यांचे पथकाने केली.



# पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०२/०६/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, सेलु शिवारातील भारत गायकवाड रा. सेलु याच्या शेतात काही इसम ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे कळमेश्वर हद्दीत सेलु शिवारातील भारत गायकवाड रा. सेलु याच्या शेतात रेड केली असता झाडाखाली काही इसम हे ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना दिसुन आले. त्यामध्ये **आरोपी नामे— १) निखील नारायण पाटील, वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ सेलु कळमेश्वर २) लिलाधर महादेव पांढूर्णेकर, वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ आलेसुर धापेवाडा कळमेश्वर ३) अमोल दादाराव पवार, वय ३६ वर्ष, रा. उमठा ता. नरखेड ४) दिलीप रामाजी धार्मीक रा. बाजारचौक धापेवाडा कळमेश्वर ५) राजेश मधुकर कुंभारे रा. धापेवाडा ६) अनिल डेहनकर रा. कळंबी ७) गौतम नारायण पाटील रा. कळमेश्वर ८) इकबाल शेख रा. कळमेश्वर ९) शमद सैयद रा. उपरवाही १०) नौशाद शेख रा. उपरवाही** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन १) नगदी २२००/— रू २) रेडमी कंपनीचा मोबाईल किंमती १०,०००/—रू ३) मोटोरोला कंपनीचा साधा किपॅड मोबाईल १०००/—रू किं. ४) नोकिया कंपनीचा साधा किपॅड मोबाईल १०००/— रू.५) ५२ तासपत्ते किं. ०० रू ६) डावावर पडलेले एकूण नगदी १८००/— रू ७) २ पाण्याच्या जुन्या कॅन किंमती ६००/— रू ८) चार्जर टॉर्च २००/— रू ९) होन्डा ॲक्टीव्हा ६ जी मोपेड क्र. डी एच— ४०/बीएच— ५७९७ कि. ७०,०००/— रू १०) तासपत्ते ५२ कि. ०० रू ११) टीव्हीएस जुपीटर मोसा क्र डीएच— ४०/बीएच ६०२१ कि. ७०,०००/— रू असा एकूण किंमती १,५६,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक योगेश कामाले, पोउपनि दत्तात्रय कोलते, पोहवा अतुल शेंडे, पोना दिनेश गाडगे, पोशि अशोक चौधरी यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर